# MEMORANDUM OF UNDERSTANDING (MoU)
# BETWEEN

Anekant Education Society's

**Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce, Baramati-413102.**

**Autonomous**

**&**

**Maharashtra Information Technology Support Center**
**"Center of Excellence"**
**Kolhapur-416012.**

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ BS 123446

अनुक्रमांक 92634 दिनांक 23/2/23 रुपये 500

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे करार

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद क्र.

मुद्रांक वापरणाराचे संपूर्ण नांव प्रा. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय

संपूर्ण पत्ता बारामती

हस्ते व्यक्तीचे नांव राजेश देवरे

पत्ता बारामती

सौ.एस.एम.तांबडे,मुद्रांक विक्रेती

परवाना क्र.२२०३०२१/२०२४ पर्यंत नुतनीकृत

विक्री-आनंदनगर,बारामती,जि.पुणे

मुद्रांक धारकाची/हस्ते व्यक्तीची सही

17 JAN

## पार्श्वभूमी:

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने राज्यातल्या निवडक महाविद्यालयांमध्ये "CENTER OF EXCELLENCE" उभे केले जाणार आहेत. या पाठीमागील महत्वाची भूमिका अशी की, राज्यांमध्ये स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणात मुले शहरी भागांमध्ये स्थलांतरित होत असतात. जीवनातील उमेदीच्या काळातील अनेक वर्ष केवळ स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

घरापासून, गावापासून, पालकांपासून लांब राहणाऱ्या मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात नैराश्याचे वातावरण तयार होते. याचे प्रमाण राज्यांमध्ये लाखोंच्या घरात आहे. खाजगी प्रशिक्षण संस्थांचे उद्देश वेगवेगळे असल्यामुळे सरसकट सर्व मुलांना प्रोत्साहन देऊन यामध्ये गुंतवून ठेवण्याचा एक प्रयत्न होत असतो आणि मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील पालक व विद्यार्थी या दुष्टचक्रात अडकतात. स्पर्धा परीक्षेचे नियोजन करत असताना स्वतःच्या करिअरसाठी एक "प्लॅन बी" देखील तितका सक्षमपणे तयार ठेवला पाहिजे आणि एका योग्य वयानंतर करिअरचा मार्ग बदलून योग्य निर्णय घेतला पाहिजे, याचे मार्गदर्शन देण्याची यंत्रणा उभे करणे हा सेंटर स्थापनेमागील महत्त्वाचा उद्देश आहे. याबाबत कट्ट्या अंतर्गत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व महाविद्यालय यांच्यामध्ये असणारा सामंजस्य करार पुढील प्रमाणे:

पार्टी नंबर १
यशवंत शितोळे
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
पत्ता: करिअर कट्टा, महिला बँक तळमजला, खासबाग मैदानाजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर-१२

पार्टी नंबर २
डॉ. चंद्रशेखर मुरुमकर
प्राचार्य
महाविद्यालयाचे नाव: तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आर्टस, सायन्स आणि कॉमर्स (स्वायत्त)

पत्ता: बारामती जिल्हा. पुणे- ४१३१०२.

Maharashtra Information Technology Support Centre, Govt. Of Mha. Regd. No. MH-22640

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

**Principal**
Tuljaram Chaturchand College
Baramati

**संकल्पना:**

महाराष्ट्र राज्य शासनाकडून सध्या राज्यभरामध्ये सहा ठिकाणी "Pre IAS Training" सेंटरच्या माध्यमातून 740 विद्यार्थ्यांच्या निवासी प्रशिक्षणाची यंत्रणा अस्तित्वात आहे. करिअर कट्ट्याच्या माध्यमातून राज्यभरामध्ये 10,000 विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठीची व्यवस्था निर्माण करणे तसेच राज्यातील महाविद्यालयांमध्ये उद्योजकीय संस्कार घडावेत व उद्योग-व्यवसाय निर्माण करणारी युवा पिढी पुढे यावी, या उद्देशाने 5000 युवा उद्योजकांना महाविद्यालयीन स्तरावर उद्योजकीय विकासासाठी आवश्यक कार्यालयीन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येईल. "CENTER OF EXCELLENCE" च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शहरातील स्थलांतर कमी करण्याचा तसेच नगण्य शुल्क आकारून विद्यार्थी आणि पालकांना स्थानिक पातळीवर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, विद्यार्थी व पालकांसाठी तज्ञांकडून समुपदेशन केले जाईल. उद्योग क्षेत्रामध्ये तसेच व्यावसायिक क्षेत्रांमध्ये ज्यांनी आपलं कर्तृत्व सिद्ध केलें आहे, अशा कर्तृत्व संपन्न व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली, नियंत्रणाखाली CENTER OF EXCELLENCE कार्यरत राहील.

## 1) स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी व अभ्यासिका:

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे MPSC परीक्षेसाठी तयारीचे प्रमाण व UPSC, केंद्र शासनाच्या वेगवेगळ्या नोकऱ्यांसाठी असणारे प्रमाण बघता महाराष्ट्रीयन विद्यार्थी तुलनात्मकदृष्ट्या केंद्र शासनाच्या नोकरीमध्ये कमी प्रमाणात तयारी करत असल्याचे लक्षात येते. यासाठी SSC & SSB याची माहिती विद्यार्थ्यांना योग्य वेळी झाली पाहिजे, त्यांच्या तयारीसाठी अभ्यासवर्ग व प्रशिक्षण उपलब्ध झाले पाहिजे तसेच हे सर्व करत असताना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून शक्य तितक्याजवळ या गोष्टी उपलब्ध होतील, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जास्त विद्यार्थी संख्या असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये १०० विद्यार्थ्यांची

अभ्यासिका जी पूर्णवेळ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असेल. सदर अभ्यासिकेमध्ये ऑनलाईन लेक्चरची सुविधा असेल ज्यामध्ये केंद्रीय पद्धतीने संपूर्ण राज्यात एकाच वेळेला सर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल. आवश्यकता भासल्यास दिल्ली, मुंबई, पुणे या ठिकाणच्या तज्ञ व अनुभवी प्रशिक्षकांची नियुक्तीदेखील करण्यात येईल.

CENTER OF EXCELLENCE या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सदर भरती प्रक्रियेसाठी निघालेल्या जाहिरातीची माहिती देणे, योग्य पद्धतीने कागदपत्रांची पूर्तता करून घेणे, त्यांचे फॉर्म भरणे आणि परीक्षेची पूर्वतयारी करून घेणे तसेच ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी तज्ञ व्यक्तींकडून मुलाखतीची तयारी करून घेणे या पद्धतीचे उपक्रम राबवले जातील. वेगवेगळया परीक्षांचे फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी सुविधा केंद्र उपलब्ध असेल. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन समुपदेशनासाठी सोय असेल. विद्यार्थी व पालकांची मागणी असल्यास समुपदेशनासाठी स्वतंत्र सेशनचे नियोजन करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक क्षमतेचा विचार करता त्यांना स्पर्धा परीक्षा ऐवजी अन्य क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणे शक्य असल्यास याबाबत देखील मार्गदर्शन केले जाईल.

**● गुणवत्ता व नियंत्रण:**

1) 1000 पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयांमध्ये तसेच ज्या परिसरामध्ये एक 1500 पेक्षा जास्त विद्यार्थी पदवीच्या पहिल्या वर्षाला असतील त्या परिसरामध्ये CENTER OF EXCELLENCE उभारण्यात येत आहे.

2) या सेंटरमध्ये 100 विद्यार्थी एकाच वेळी अभ्यास करू शकतील, अशी अभ्यासिकेची रचना करण्यात येईल. त्यासाठी लागणारे बेंचेस, लेक्चरसाठीचे interactive board असतील.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

3) सोबत Common Facility Center असेल ज्यामध्ये संगणक उपलब्ध करून विद्यार्थी, आपले कागदपत्र स्कॅन करणे, परीक्षेचे फॉर्म भरणे, हॉल तिकीट generate करणे, प्रिंट काढणे या सोयी असतील.

4) या सेंटरमध्ये SSC/SSB/UPSC/MPSC या सर्व स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण चालतील व इतर वेळेला विद्यार्थी अभ्यासिकेत बसून स्वयं अध्ययन करतील.

5) अभ्यासिका सकाळी 06.00 ते संध्याकाळी 08.00 वाजेपर्यंत चालू असेल. यामध्ये संध्याकाळी 05.00 ते 08.00 online प्रशिक्षण असेल.

6) अभ्यासिकेचा मासिक खर्च निघावा यासाठी अग्रणी महाविद्यालय काही शुल्क करू शकतील, पण या माध्यमातून शुल्क ठरवत असताना क्लस्टरमध्ये येणाऱ्या महाविद्यालयाचे प्राचार्य व समन्वयक यांच्याशी सल्लामसलत करून ठरवावे.

7) या सेंटरमध्ये विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर जसा फोकस असेल त्याचप्रमाणे त्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेकडेही लक्ष देण्यात येईल. यासाठी विद्यार्थ्यांची Psychology Test घेण्यात येईल. यातून तो विद्यार्थी कोणत्या स्पर्धा परीक्षेसाठी तयार आहे हे कळेल. ऑनलाइन समुपदेशनाच्या माध्यमातून पालकांना आणि विद्यार्थ्यांना समुपदेशन करतील. परंतु कोणाला वैयक्तिक समुपदेशन हवे असल्यास पालकांच्या मागणीप्रमाणे वैयक्तिक समुपदेशनही करण्यात येईल.

## २) उद्योजकता विकास केंद्र:

राज्यात सद्यस्थितीला उद्योजकीय कौशल्य वाढीसाठी आवश्यक अशी व्यवस्था अस्तित्वात नाही. Entrepreneurship Development Cell, Incubation Center हे प्रत्येक महाविद्यालयामध्ये असावे असा राज्य व केंद्र शासनाच्या धोरणांमध्ये झालेल्या बदल विचारात घेता महाविद्यालयीन व्यवस्थापन, प्राध्यापक, प्राचार्य यांच्यापर्यंत हा विचार प्रभावीपणे पोहोचवणे आणि उद्योग क्षेत्रातील यशस्वी उद्योजकांच्या, संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या व बँक प्रशासनाच्या माध्यमातून महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी योग्य ते

Maharashtra Information Technology Support Centre, Govt Of Mha. Regd. No. MH-22640

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, त्यांचा उद्योजकीय विकासाला चालना देणे या उद्देशाने महाविद्यालयीन स्तरावर प्रत्येक सेंटरमध्ये 50 विद्यार्थ्यांच्या Student Start-up च्या कामकाजासाठी कार्यालयीन व्यवस्था उपलब्ध करून देणे हा CENTREOF EXCELLENCE चा महत्त्वाचा उद्देश आहे.

विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय संकल्पनांना विस्तारणासाठी आवश्यक असणाऱ्या व्यावसायिक सल्लागार व्यक्तींची उपलब्धता विद्यार्थ्यांना करून देणे, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर चालणाऱ्या उद्योजकीय बदलांविषयी, तंत्रज्ञानाविषयी आणि कायद्याविषयी त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करून देणे, विद्यार्थी आणि उद्योजक यांचा सातत्याने संवाद आयोजित करून त्या माध्यमातून उद्योग जगतातील घडामोडी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत असतानाच त्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी CENTER OF EXCELLENCE कार्यरत असेल. विद्यार्थ्यांच्या राजकीय नेतृत्वाच्या विकासासाठी विद्यार्थी संसद ज्या पद्धतीने कार्य करते त्याच पद्धतीने उद्योजकीय नेतृत्व विकासासाठी प्रत्येक सेंटरमध्ये "Student Start-up Company" नोंदणीकृत असेल आणि विद्यार्थी संसदेमधील मंत्रिमंडळाप्रमाणेच या कंपनीमधील व्यवस्थापकीय प्रमुख, आर्थिक व्यवस्थापक प्रमुख, या पद्धतीच्या वेगवेगळया पदांवर काम करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना यावा, यासाठी Student Start-up ला गती देण्यात येईल.

● उद्देश:

1) जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षा पास होऊ शकत नाहीत त्या विद्यार्थ्यांसाठी या सेंटरमध्ये उद्योजकता विकास हा उपक्रम राबविण्यात येईल.

2) यामध्ये 50 विद्यार्थ्यांना ऑफिस चालवण्यासाठी लागणारा set up उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामध्ये conference room, desk व इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

Gove Of Mha. Regd. No. MH - 22... Maharashtra Information Technology Support Centre

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

3) 1 वर्ष हे विद्यार्थी student start up म्हणून काम करतील. या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी महाविद्यालयाबरोबर नोंदणी करून स्टार्टअप चालू करणार असतील त्यांना रुपये 1,00,000/- देण्यात येतील.

4) महाविद्यालयाला लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करणे, ग्रामीण भागातील वस्तू शहरी भागात उपलब्ध करून देणे व शहरी भागातील वस्तू ग्रामीण भागात उपलब्ध करून देणे या प्रक्रियेमुळे एक Interconnected Hub निर्माण होऊ शकते व यातूनच विद्यार्थी उद्योग कसा करावा, हे समजू शिकतील.

5) यामध्ये जे विद्यार्थी प्रत्यक्ष कार्यानुभव घेतील त्यांना अनुभव प्रमाणपत्र देण्यात येईल.

6) यामध्ये विद्यार्थी Branding, Packaging, logo making, Service provider model, IPR formalities, Time management, decision making या सर्व गोष्टी शिकतील.

● गुणवत्ता व नियंत्रण:

1) या सगळया प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्या भागातील प्रसिद्ध उद्योजक सल्लागार समितीवर कार्यरत असतील.

2) विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून एकदा मार्गदर्शन करण्यात येईल, ज्यामध्ये-

पहिला आठवडा:- बँकेच्या अधिकारी बँकांच्या योजना सांगतील.

दुसरा आठवडा:- जिल्ह्यातील उद्योग केंद्राचे अधिकारी मार्गदर्शन शासकीय योजना सांगतील.

तिसरा आठवडा:- प्रायव्हेट कन्सल्टंट यांचे मार्गदर्शन करतील.

Maharashtra Information Technology Support Centre Govt Of Mha. Regd. No. MH

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

चौथा आठवडा:- आंतरराष्ट्रीय उद्योजक ऑनलाईन मार्गदर्शन करतील.

● नियम व अटी:

1) क्लस्टरमध्ये सहभागी असणाऱ्या सर्व महाविद्यालयातील पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेणारे सर्व विद्यार्थी करिअर कट्ट्याला नोंदणी करणे आवश्यक आहे, याची जबाबदारी अग्रणी महाविद्यालयाच्या समन्वयकांची असेल.

2) CENTER OF EXCELLENCE चे निर्णय घेत असताना क्लस्टरमध्ये सहभागी महाविद्यालय समन्वयक व प्राचार्य, तसेच अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक प्राचार्य, त्या जिल्ह्याचे प्राचार्य प्रवर्तक तसेच जिल्हा समन्वयक, भागातील एक यशस्वी उद्योजक, निवृत्त प्रशासकीय अधिकारी व विद्यार्थी प्रतिनिधी या सर्वांचा समावेश असलेल्या स्थानिक नियामक मंडळाच्या बैठकीत संगणमताने घेण्यात यावेत.

CENTER OF EXCELLENCE नियामक मंडळ:

1) प्राचार्य प्रवर्तक

2) जिल्हा समन्वयक

3) क्लस्टर मधील सहभागी महाविद्यालयाचे प्राचार्य

4) क्लस्टर मधील सहभागी महाविद्यालयाचे समन्वयक

5) अग्रणी महाविद्यालयाचे प्राचार्य

6) अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक

7) यशस्वी उद्योजक

8) निवृत्त प्रशासकीय अधिकारी

9) विद्यार्थी प्रतिनिधी

Maharashtra Information Technology Support Centre, Govt. Of Mha. Regd. No. MH -

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

3) करिअर कट्ट्या अंतर्गत CENTER OF EXCELLENCE चालवत असताना 100 विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभी करण्यासाठी जो ₹10,00,000/- निधी दिला जाणार आहे. त्याची वितरण नियमावली पुढील प्रमाणे-

1) प्रतिवर्षी 20% (₹ 2,00,000) या पद्धतीने निधी वितरण होईल.

2) पुस्तके, फर्निचर, डिजिटल साधनसामग्री (interactive board/sound system) यांचा प्राधान्यक्रम ठरवण्याचा अधिकार महाविद्यालयाचा असेल.

3) निधी वितरित करत असताना क्लस्टर मध्ये असलेल्या करिअर कट्टा मधील सहभागी असणाऱ्या विद्यार्थी संख्येवर निधी वितरणाचे गुणोत्तर अवलंबून असेल.

4) करिअर कट्ट्याकडून केंद्रीय पद्धतीने वस्तू खरेदी करून महाविद्यालयास वितरित केल्या जातील, यासाठी करिअर कट्ट्याने स्थापन केलेली खरेदी समिती निर्णय घेईल.

5) CENTER OF EXCELLENCE साठी दिलेली जागा (अभ्यासिका/ Incubation Center) ही पूर्ण वेळ त्याच उद्देशासाठी वापरली जाणे आवश्यक आहे.

6) CENTER OF EXCELLENCE मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे खालीलप्रमाणे:

50% जागा या अग्रणी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी,

20% जागा या pass out विद्यार्थ्यांसाठी,

30% जागा या आजूबाजूच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असतील.

7) CENTER OF EXCELLENCE अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या Incubation Center साठी क्लस्टर मधून नियमक मंडळाने 15 विद्यार्थ्यांची निवड स्टुडन्ट स्टार्टअप कंपनीचे पदाधिकारी म्हणून करावी.

8) Incubation Center चे पदाधिकारी म्हणून निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या नियोजित व्यवसायाची निवड करण्यासाठी नियामक मंडळ व निवडलेले पदाधिकारी यांनी वेगवेगळया संकल्पनांचे सादरीकरण घेऊन त्यामधून एका व्यवसायाची निवड करावी.

9) सदर निधी मधील 15 टक्के भाग हा व्यवस्थापकीय खर्चावर खर्च करता येईल उर्वरित 85% भाग हा व्यवसायाचे मुख्य उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वापरला जाणे आवश्यक आहे.

10) सदर व्यवसाय करत असताना महाविद्यालय करिअर कट्टा यांची आर्थिक जबाबदारी उपलब्ध करून दिलेल्या भांडवला इतकीच मर्यादित राहील. याव्यतिरिक्त कोणत्याही पद्धतीची आर्थिक जबाबदारी/ दायित्व व्यवसायातून पदाधिकाऱ्यांनी निर्माण केल्यास त्याची जबाबदारी त्यांची वैयक्तिक राहील.

11) CENTER OF EXCELLENCE अंतर्गत येणाऱ्या Incubation Center ला नियमक मंडळांनी मान्यता दिलेल्या व्यवसायासाठी कोणत्याही पद्धतीचे कर्ज घेता येणार नाही.

12) महाविद्यालयाच्या आवारामध्ये व्यवसाय करत असताना त्या व्यवसायाचा कोणत्याही पद्धतीचा त्रास महाविद्यालयाच्या नियमित कामकाजास होणार नाही याची दक्षता व पदाधिकाऱ्यांनी घ्यावयाची आहे, तसेच सदर व्यवसाय करत असताना कोणत्याही समाजविघातक गोष्टींना प्रोत्साहन मिळेल अशा बाबींचा समावेश व्यवसायामध्ये असू नये.

13) मागील वर्षी दिलेला निधी वापरून केलेल्या व्यवसायातून काही नफा निवडलेल्या पदाधिकाऱ्यांनी मिळवला असल्यास त्याचे वितरण तीन समान भागांमध्ये करण्यात येईल यामध्ये विद्यार्थी पदाधिकारी, करिअर कट्टा व महाविद्यालय यांचा समावेश असेल.

Maharashtra Information Technology Support Centre Gove Of Mha. Regd. No. MH - 2264

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

14) सदर निधी वापरून केलेल्या व्यवसायामध्ये 100% तोटा झाल्यास कोणत्याही पद्धतीने वसुली विद्यार्थी, पदाधिकारी किंवा महाविद्यालय यांच्याकडून केली जाणार नाही, तसेच पुढच्या वर्षी दिल्या जाणाऱ्या निधीवर त्याचा कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही.

15) महाविद्यालयाच्या प्रयत्नांमुळे सदर विद्यार्थ्यांनी केलेले व्यवसायामध्ये झालेल्या नफ्यातील करिअर कट्ट्याला मिळालेल्या नफ्याच्या हिश्यातील 50 % रक्कम पुढील वर्षी दिल्या जाणाऱ्या 1,00,000 रुपये निधीमध्ये वाढवून दिले जातील.

16) सदर व्यवसाय करत असताना विद्यार्थ्यांना व्यवसायासाठी आवश्यक कायदेशीर बाबी, बाजारपेठेची माहिती, तसेच आर्थिक व्यवहार करत असताना घ्यावयाची काळजी याविषयी त्यांना सुरुवातीलाच प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

17) Revenue generate झाल्यावर त्यातील काही भाग लीड महाविद्यालयाचा असेल.

18) CSR/उद्योग मंत्रालय/Skill development यांचा Additional fund महाविद्यालयाला उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असेल.

19) महाविद्यालयाच्या प्राधान्याप्रमाणे त्यांचे सभा घेऊन, त्यांची गरज पाहून त्यांना सेंटर चालू करण्यासाठी लागणारी उपकरणे उपलब्ध करून दिली जातील.

वरील प्रमाणे सर्व प्रक्रिया पूर्ण करून परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा विषयी तसेच उद्योजकता विकास विषयी योग्य प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने सेंटर चालवत असताना महाविद्यालय व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे राहतील:

## * MITSC ची जबाबदारी:

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

१) सेंटर ऑफ एक्सलन्स मध्ये सहभागी असणाऱ्या अग्रणी महाविद्यालयांना फर्निचर, पुस्तके, डिजीटल साधनसामग्री ( Interactive Board, sound systems) साठी उपलब्ध करुन देणे, निधी उपलब्ध करुन देणे.

२) सेंटर ऑफ एक्सलन्समधील कामकाज सुरळीत चालण्यासाठी आवश्यक त्या भेटी देणे.

३) सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये चालणाऱ्या कामकाजांवर नियमन आणि नियंत्रण ठेवणे.

४) सेंटर ऑफ एक्सलन्समधील विद्यार्थ्यांच्यासाठी ऑनलाईन पद्धतीने सर्व पद्धतीचे प्रशिक्षक उपलब्ध करून देणे.

५) सेंटर ऑफ एक्सलन्स आणि शासन/ विभाग यामध्ये समन्वयक म्हणून कार्य करणे.

६) महाविद्यालयाने नमेलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्स समितीच्या सभा घेणे आणि आवश्यक तेथे निर्णयांस सहाय्य करणे.

७) सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा वापर योग्य त्या कारणासाठी/ उद्देशपूर्तीसाठी होण्याकरिता यावर नियंत्रण ठेवणे.

८) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण हितासाठी आवश्यक असे विद्यार्थी हिताचे निर्णय घेणे.

*** महाविद्यालयाची जबाबदारीः**

१) सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये सहभागी असणाऱ्या अग्रणी महाविद्यालयातील पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी करिअर कट्ट्याची नोंदणी करुन घेण्याची जबाबदारी अग्रणी महाविद्यालयाची असेल.

२) सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी आवश्यक अशा अभ्यासिका, Common Facility Center, Entrepreneurship Development Cell/ Incubation Center तयार करुन घेणे आणि त्याचा पूर्णवेळ वापर त्याच कामासाठी करणे.

Maharashtra Information Technology Support Centre Gove Of Mha. Regd. No. MH-22...

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

४) सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी करिअर कट्ट्यामार्फत दिलेल्या साहित्याची ( फर्निचर, पुस्तके, डिजीटल साधनसामग्री ( Interactive Board, sound systems) देखभाल आणि आवश्कतेनुसार दुरुस्ती करणे.

५) करिअर कट्ट्यामार्फत वेळोवेळी मागवले जाणारे विविध रिपोर्ट वेळेत सादर करणे.

६) करिअर कट्ट्याने ठरवून दिल्याप्रमाणे सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी समिती नेमणे, त्यांच्या नियमित सभा घेणे आणि त्याविषयी वेळोवेळी माहिती देणे.

७) अग्रणी महाविद्यालयाने परिसरातील इतर महाविद्यालये आणि करिअर कट्टा यामध्ये समन्वयक म्हणून काम करणे.

८) करिअर कट्ट्यातंर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू करणेसाठी महाविद्यालयाच्या संस्थेची परवानगी आणि इतर बाबींची पूर्तता करून घेणे.

## कालावधी:

सदर सामंजस्य करार नोंदणी तारखेपासून ६० महिन्याच्या कालावधीसाठी आहे.

## न्यायालयीन कार्यक्षेत्र :

सदर सामंजस्य करारांतर्गत उद्भवलेल्या कोणत्याही कायदेशीर समस्येसाठी न्यायालयीन प्रक्रियेसाठी कोल्हापूर जिल्हा न्यायालय हे कार्यक्षेत्र असेल.

## दुरुस्ती व बदल :

सदर सामंजस्य करारांतर्गत नियम अटी व कार्यपद्धतीमध्ये कालानुरूप विद्यार्थी हितासाठी काही बदल करावयाचे झाल्यास दोघांच्या संमतीने स्वतंत्र परिशिष्टाचा समावेश करून बदल करता येतील.

Maharashtra Information Technology Support Centre Govt Of Mha. Regd. No. MH-2/09

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

पार्टी नंबर १
यशवंत शितोळे
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

Maharashtra Information Technology Support Centre
Gove Of Mha.
Regd. No.
MH - 22640

पार्टी नंबर २
डॉ. चंद्रशेखर मुरुमकर
प्राचार्य

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

TULJARAM CHATURCHAND COLLEGE
BARAMATI

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आर्टस, सायन्स आणि कॉमर्स (स्वायत्त), बारामती जिल्हा. पुणे- ४१३१०२.

साक्षीदार

1) Amruta Maruti Patil
2) Rushikesh Subhash Kambale

साक्षीदार

1) डॉ. योगिनी मुळे (उपप्राचार्य)
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

2) डॉ. रामचंद्र सपकाळ (उपप्राचार्य)
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

3) प्रा. दीपाली अनपट
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

4) प्रा. महेश फुले
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

Jun

# Maharashtra Information Technology Support Center
# महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

MITSC/OUT/FEBRUARY 2023/M/1495 दि.28/02/2023

**प्रति,**
**तुळजाराम चतुरचंद कॉलेज ऑफ आर्ट्स,सायन्स अँड कॉमर्स,(स्वायत्त)**
**बारामती**

**विषय: सेंटर ऑफ एक्सलन्स व मॉडेल स्किल डेव्हलपमेंट MOU प्रत पाठवणेबाबत.....**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की,आपल्या महाविद्यालयाकडून **दिनांक 25 फेब्रुवरी 2023 रोजी "सेंटर ऑफ एक्सलन्स"व "मॉडेल स्किल डेव्हलपमेंट"** अंतर्गत पाठवलेल्या **सामंजस्य कराराची प्रत** आपल्या माहितीसाठी सही, शिक्क्यासह पाठवत आहोत.

कळावे,
आपला विश्वासू,

Yasswant

**यशवंत शितोळे**
**अध्यक्ष**
**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान**
**सहाय्यता केंद्र**

**सोबत : MOU ची झेरॉक्स प्रत.**

**Yashwant Shitole**
*Founder President*
**+91 73044 29777**

Mahila Bank Basement,
Khasbag Maidan, Kolhapur-416 012
0231-2993950
www.mitsc.co.in
uvajagar@gmail.com

Inf. Nagar
IQAC

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: 537
दिनांक 11 MAR 2023

11/3

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2022 © BU 147804

Maharashtra Information Technology Support Centre
Gove Of Mha. Regd. No. MH - 22640

*AGREEMENT*

THIS AGREEMENT is made by the **Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce (Autonomous), Baramati Dist- Pune 413102** between

1. **Maharashtra Information Technology Support Centre Maharashtra**, We have been working for the noble cause of youth empowerment. Since 2006 our major presence is in the state of Maharashtra. Our focus is on providing job specific skills to youth as per the local & global demand of the industries. We are associated with more than 8 multi faculty universities in the state of Maharashtra, this association is through the higher and technical ministries of the government of Maharashtra. Our motto is to provide value-added skilled human resources. Along with developing entrepreneurial skills among the youth.

We are working with the government of India & government of Maharashtra to implement their various schemes & programs related to skill development empowerment of youth. Our efforts & initiatives in this field will be ultimately useful for national development with national productivity. During this span of a decade, we have provided services to more than 33 thousand youth in 8 universities covering 35 districts.

2. **Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce (Autonomous), Baramati Dist- Pune 413102**, a college providing Skills Training Incorporated in India and having its business address at **Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce (Autonomous), Baramati Dist- Pune 413102** (which expression shall unless repugnant to the context or meaning thereof include its successors, assigns and authorized representatives) represented by its Principal, **Prof. Dr. Chandrashekhar Murumkar** (Hereinafter referred to as Party of the Second Part- College)

AND WHEREAS the parties hereto have shown the intention to associate and co-operate with each other and the Party of the Second Part has agreed to work with the Party.

The Party of the Second Part fulfills the infrastructural parameters, delivers the agreement terms and performs by delivering their respective responsibilities to conduct the said Course(s) (Hereinafter referred to as 'the Course') for the consideration and upon the terms and conditions herein contained.

And WHEREAS, the following terms and conditions are agreed and executed for the subject-matter of revenue and finance, roles, responsibilities and duties between the Parties of the First Part and the Party of the Second Part/Training Centre Partner are as follows:

A. FINANCIAL MATTERS:

1. **The Training Centre shall be paid their share as 70% (after deducting TDS) of the invoice amount received by Government. [within 5 working days from the date of receiving payment.]**
2. The training partner shall be paid their share as 30% of the invoice amount receive by the government. **(after deducting TDS) of the invoice amount received by Govt. [within 5 working days from the date of receiving payment.]**
3. The Centre Accreditation, Affiliation, Centre Monitoring Fees & Empanelment Fees including fees paid for job role at actual required shall paid by **(Trainning Center)**, as per there requirement of PMKVY 4.0 NSDC CSSM, MSSDS of any other scheme.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Maharashtra Information Technology Support Centre Gove Of Mha. Regd. No. MH - 22640

B. ROLE OF MITSC:

1. MITSC will act as a facilitator for training center.
2. MITSC will be single point of contact for any operations related matter.
3. MITSC will help to college in conducting course as per government norms.
4. MITSC will check & review all the process regarding project.
5. MITSC shall make payments as per the Clauses (1) & (2) of this Agreement.
6. MITSC shall monitor the flow of work of training course(s) conducted by the Execution Partner (Trainning Center).
7. MITSC shall guide and support the Execution Partner and College whenever possible, in conducting and execution of the training course(s).
8. MITSC shall coordinate with NSDC to ensure timely validation of the Centre(s) and for sufficient training target allocation to the Centre(s).
9. MITSC shall assist the training partner in creating industry links for on job training (OJT), internships and placements wherever necessary.

C. RESPONSIBILITIES OF THE COLLEGE:

1. That College shall appoint trainner for the purpose of training of the course under PMKVY 4.0 NSDC CSSM,MSSDS
2. That the College shall conduct TOT (Training of Trainers) of the course at its own expenses.
3. That the College shall make available all the requisite infrastructure for successful completion of training course(s), as per the laid Government and other norms.
4. That the College shall mobilize the students as per the defined eligibility criteria & documents as per the PMKVY 4.0 NSDC CSSM,MSSDS guidelines.
5. That on the day of the assessment, the College shall ensure that the necessary facilities are provided to the assessor and adequate labs infrastructure with all the necessary raw materials are provided for the assessment purpose.
6. That College shall help execute all Training Courses and complete it within the given time limits in the guidelines of PMKVY 4.0 NSDC CSSM, MSSDS.
7. That College shall ensure regular classes are conducted and that there is record of 80% attendance of the trainees during the training and 100% attendance on the day of assessment.
8. That College shall conduct of the recruitment drive of the student after successful completion / qualification in the course(s) in the various industries, at its own cost.
9. That College shall provide the Training Centers with Trainer Manuals, presentation material, student workbooks and assessment sheets and other program collaterals as required.
10. That College shall support the MITSC in the duration of the training course(s) and assessment.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Maharashtra Information Technology Support Centre Gove Of Mha. Regd. No. MH - 22640

D. OTHER:

1. That this Agreement shall be irrevocable until the completion and execution of all Courses under the PMKVY 3.0/4.0Scheme given to the College In case of any dispute or any controversy or any claim arising out of or relating to this agreement, or the breach there of between the Parties will be settled through Arbitration methods in the Indian Law.
2. That this Agreement may be amended only by a written instrument signed by the duly authorized representatives of all the Parties in this Agreement.
3. CONFIDENTIALITY: The College shall not disclose to any third party any details regarding the Company's business, including, without limitation any information regarding any of the Company's details, (ii) make copies of any Confidential Information or any content based on the concepts contained within the Confidential Information for personal use or for distribution unless requested to do so by the Company, or (iii) use Confidential Information other than solely for the benefit of the Company Immediately upon
4. Duration of this agreement is 60 months from effective date of agreement.
5. Termination of the relationship between both the Parties, the Parties shall return to the other party any documents / things, etc. pertaining to its Company's business.
6. TERMANDTERMINATION: This Agreement shall commence upon the date of execution and continue until either Party terminates this Agreement in writing in thirty days prior notice. The Agreement shall be deemed terminated if the College is to be found not following the terms and conditions of this Agreement.
7. PARTIAL INVALIDITY: If any provision of this AGREEMENT is held by a court of competent jurisdiction to be invalid, void or unenforceable, the remaining provisions will never the less continue in force without being impaired or in validated in anyway.
8. FORCE MAJEURE: The Parties here to agree that the Second Party shall not be deemed to be in default if the performance of its obligations here under is delayed or prevented by conditions constituting force majeure, strikes, fire, war, riots, floods, or any act of God, any laws, orders, rules or directions of any Government or municipal or statutory agency or authority, or any other reason, or cause what so ever beyond reasonable control of Second Party. Under the said circumstances, the First Party shall not be liable to pay any compensation for the duration constituting Force Majeure.
9. JURISDICTION: That in case of any dispute between the parties, the Courts of Pune shall have the Jurisdiction.

That this agreement made on **21/02/2023** between the parties here to and supersedes all prior or contemporaneous, oral or written understanding, negotiations, or communications on behalf of such parties in respect of the subject matter here in.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Maharashtra Information Technology Support Centre Gove Of Mha. Regd. No. MH - 22640

IN WITNESS WHERE OF the parties have executed this agreement effective as of the date first written above.

1. For & behalf of MITSC:

Authorized Signatory
Seal:
Name: **Mr. Yashwant Shitole**
Address: pratibha nagar , Kolhapur
Email: uvajagar@gmail.com
Contact Number: 7304439777

2. For & behalf of the **College**

Authorized Signatory:
Seal:
Name: **Prof. Dr. Chandrashekhar Murumkar**
Address: Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce (Autonomous), Baramati Dist- Pune 413102
Email: principal.tccollege@gmail.com
Contact Number: 9850640140

Witness: (Signature, Name and Address) Signature

**1. Dr. Yogini Mulay, Vice-Principal**
Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce (Autonomous), Baramati Dist- Pune 413102

**2. Dr. Ramchandra Sapkal, Vice-Principal**
Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce (Autonomous), Baramati Dist- Pune 413102

**3. Prof. Siddharth Sorate**
Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce (Autonomous), Baramati Dist- Pune 413102

**4. Prof. Deepali Anpat**
Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce (Autonomous), Baramati Dist- Pune 413102